पुढारी

संक्षिप्त

## डॉ. बापूजी साळुंखे अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र महाविद्यालयातर्फे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डॉ. बापूजी साळुंखे अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने आय ट्रीपल ई इंटरनॅशनल ब्लॉकचेन वितरित प्रणाली व सुरक्षा या विषयावर शुक्रवारपासून (दि. ३१) तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्री स्वामी विवेकानंद संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. परिषदेची सुरुवात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते दि. ३० रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. पहिल्या दिवशी ब्लॉकचेनमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांकरिता दोन विशेष व्याख्याने होणार आहेत. दि. ३१ रोजी परिषदेचे उद्‌घाटन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता होणार आहे. परिषदेत जपानच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ वैभव मेहता प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. ऑस्ट्रेलिया येथील करटेन युनिव्हर्सिटीचे शास्त्रज्ञ डॉ. विद्यासागर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे विद्यापीठ यांचे कुलगुरू डॉ. राजेश इंगळे, आय ट्रीपल ई पुणेचे चेअरमन डॉ. अमर बुचडे, बॉम्बेचे चेअरमन डॉ. समीर नानिवडेकर, ब्लॉकचेन ग्रुपचे चेअरमन डॉ. विनीत कोटक आदी उपस्थित राहणार आहेत. दि. १ नोव्हेंबर रोजी तीन चर्चासत्रे होणार आहेत. परिषद यशस्वीतेसाठी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, संस्थेच्या व्यावसायिक विभागांचे संचालक प्रा. विरेन भिर्डी, प्राचार्य डॉ. सुहास सपाटे परिश्रम घेत आहेत.

पुण्य नगरी

# डॉ. साळुंखे इन्स्टिट्यूटमध्ये ३० रोजी आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीतर्फे दि. ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर कालावधीत विवेकानंद महाविद्यालय येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ब्लॉकचेन डिस्ट्रिब्युटेड सिस्टीम अँड सिक्युरिटी' या विषयावर होणाऱ्या या परिषदेत जगभरातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गावडे म्हणाले, इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर्स (आयईईई) आणि कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया पुणे यांच्या सहकार्याने ही परिषद होत आहे. याचे उद्घाटन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेत जपान, सौदी अरेबिया, अमेरिका आणि भारतातील नामांकित विद्यापीठे, संस्थांमधील संशोधकांचे १०७९ शोधनिबंध परिषदेस प्राप्त झाले आहेत. त्यातील निवडक २१० शोधनिबंध सादर केले जातील.

या परिषदेत जपानच्या सुरक्षा मंत्रालयाचे अधिकारी वैभव मेहता, ऑस्ट्रेलियातील करटेन विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. विद्यासागर पोतदार, डॉ. आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, डॉ. राजेश इंगळे असे तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. परिषदेला संस्थेचे प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

या पत्रकार परिषदेला प्राचार्य वीरेन भिर्डी, प्राचार्य सुहास सपाटे, अमित आवाड उपस्थित होते.

Kolhapur Edition

Oct 28, 2025 Page No. 06

Powered by: erelego.com

हॅलो प्रभात



# डॉ. बापूजी साळुंखे इंजिनिअरिंगमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

## देश-विदेशातील तज्ज्ञांची उपस्थिती

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीतर्फे इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ब्लॉकचेन, डिस्ट्रीब्यूटेड सिस्टम्स अँड सिक्युरिटी या विषयावर ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

जपान, अमेरिका, सौदी अरेबियासह विविध देशांतील तज्ज्ञांकडून १०७९ शोधनिबंध प्राप्त झाले असून, त्यापैकी २१० निवडक शोधनिबंध सादर होणार आहेत. प्रमुख व्याख्याते म्हणून जपानच्या सुरक्षा मंत्रालयाचे वैभव मेहता आणि ऑस्ट्रेलियातील करटेन विद्यापीठाचे डॉ. विद्यासागर पोतदार मार्गदर्शन करणार आहेत.संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. सुहास सपाटे, संचालक प्रा. विरेन भिर्डी आणि मुख्य प्रशासकीय अधिकारी अमित आवाड , हितेंद्र साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नवे क्षितिज खुले करणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

तरुण भारत संवाद

# डॉ.बापूजी साळुंखे इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीने 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ओन ब्लॉकचेन डिस्ट्रीब्युटेड सिस्टम्स अँड सिक्युरिटी' या अत्याधुनिक विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन दिनांक ३०, ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर दरम्यान केले आहे.**

◆ प्रतिनिधी, कोल्हापूर

- कौस्तुभ गावडे यांनी पत्रकार परिषदेत माहिती
- ३०, ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर दरम्यान परिषद

आयईईई मुंबई सेक्शन, पुणे सेक्शन आणि कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ही सिग्नेचर परिषद होत आहे. महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे. देश परदेशातील अनेक तज्ञांचे विविध विषयांवर मार्गदर्शन होणार आहे. त्यामुळे संशोधन क्षेत्राला उल्लेखनीय गती मिळेल, अशी माहिती संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर्स ही जगप्रसिद्ध तांत्रिक व्यावसायिक संस्था आहे. नेटवर्कींग, इंटरनेट, वायफायची जागतिक मानके विकसित करण्यात 'आयईईई'चे महत्त्वाचे योगदान आहे. 'आयईईई'ची ही दक्षिण महाराष्ट्रातील पहिलीच परिषद आहे. जपान, अमेरिका, सौदी अरेबिया अशा परदेशातील आणि भारतातील नामांकित विद्यापीठातील, तंत्रज्ञान संस्थांमधील संशोधकांचे एकूण १०७९ शोधनिबंध परिषदेस प्राप्त झाले असून निवडक २१० शोधनिबंध सादर व प्रकाशित करण्यात येणार आहेत.

परिषदेमध्ये जपान च्या सुरक्षा मंत्रालयातील उच्च अधिकारी वैभव मेहता यांचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे. ऑस्ट्रेलिया येथील करटेन युनिव्हर्सिटीचे शास्त्रज्ञ डॉ. विद्यासागर पोतदार यांचेही व्याख्यान आयोजित केले आहे. या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरेचे कुलगुरु डॉ. कारभारी काळे, डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे विद्यापीठ यांचे कुलगुरू डॉ. राजेश इंगळे यांच्यासह अनेक नामांकित इंजिनिअरिंग महाविद्यालयातील प्राचार्य, संशोधक, प्राध्यापक, उद्योजक, धोरणकर्ते विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. परिषदेच्या मुख्य विषयाच्या अनुषंगाने पॅनल चर्चा होऊन नवीन संकल्पनांचा उदय होईल. तसेच संशोधन क्षेत्रातील सहयोग वाढेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. शिक्षण, संशोधन आणि सामाजिक विकास यासाठीही परिषद महत्त्वाची आहे.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे यांचे आंतरराष्ट्रीय परिषदेला मार्गदर्शन लाभले आहे. संस्थेच्या व्यावसायिक शिक्षण समूहाचे संचालक प्राचार्य विरेन भिर्डी, इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. सुहास सपाटे, मुख्य प्रशासकीय अधिकारी अमित आवाड आदी उपस्थित होते.

लोकमत

मस्ट READ

# शाश्वत विकास, सुरक्षेसाठी तंत्रज्ञान अनिवार्य

## कारभारी काळे : साळुंखे इन्स्टिट्यूटमध्ये परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क




कोल्हापुरात शुक्रवारी डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या वतीने 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ब्लॉकचेन डिस्ट्रिब्युटेड सिस्टिम्स अॅन्ड सिक्युरिटी' या परिषदेत डॉ. कारभारी काळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. राजेश इंगळे, डॉ. अमर बुचडे, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, कौस्तुभ गावडे आदी उपस्थित होते.

**कोल्हापूर :** शाश्वत विकास, सुरक्षेसाठी तंत्रज्ञान अनिवार्य असून, तंत्रज्ञानाच्या विकासासाठी अशा प्रकारच्या परिषदांची गरज आहे. नवसंशोधकांनी निरीक्षण, श्रवण, लेखन आणि अभ्यास वृद्धिंगत करून समाज सक्षम करावा' असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीचे (लोणेरे) कुलगुरू प्रा.डॉ. कारभारी काळे यांनी केले.

डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आणि इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिक अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर्स (पुणे व मुंबई सेक्शन), कॉम्प्युटर सोसायटी ऑफ पुणे यांच्या वतीने 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ब्लॉकचेन डिस्ट्रिब्युटेड सिस्टिम्स अॅन्ड सिक्युरिटी' या तीन दिवसीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. प्राचार्य अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. काळे म्हणाले, " जिओ स्पेशल सेन्सर आणि क्वांटम टेक्नॉलॉजीमुळे डिजिटलायझेशन आणि सुरक्षेचे नवीन युग सुरू झाले आहे.

**दक्षिण महाराष्ट्रातील ही पहिलीच परिषद आहे. सात देशांतील तब्बल १०८९ संशोधकांचे शोधनिबंध परिषदेसाठी प्राप्त झाले आहेत.**

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे म्हणाले, डिस्ट्रिब्युटेड सिस्टिममुळे पारदर्शकता आणि विश्वास यांच्या बाबतीत तोडजोड होऊ नये, यासाठी जागरूक राहणे गरजेचे आहे. सहकार्यातून संशोधन, विचारांचे आदानप्रदान, कटिंग-एज रिसर्च यासाठी या परिषदेमुळे प्लॅटफॉर्म मिळाला आहे.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे कुलगुरू डॉ. राजेश इंगळे, आयईईई पुणे चॅप्टरचे अध्यक्ष डॉ. अमर बुचडे, डॉ. विनीत कोटक, प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी मार्गदर्शन केले.

Kolhapur Main
Page No. 4 Nov 01, 2025
Powered by: erelego.com

पुढारी

# शाश्वत विकास, सुरक्षेसाठी तंत्रज्ञान अनिवार्य

## कुलगुरू डॉ. काळे; डॉ. बापूजी साळुंखे इंजि. इन्स्टिट्यूटमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद




**कोल्हापूर : डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू प्रा. डॉ. कारभारी काळे. व्यासपीठावर प्राचार्य अभयकुमार साळुंखे, कौस्तुभ गावडे, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य विरेन भिर्डी आदी.**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शाश्वत विकास आणि सुरक्षेसाठी तंत्रज्ञान अनिवार्य असून तंत्रज्ञानाच्या विकासासाठी परिषदेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. नवसंशोधकांनी निरीक्षण, श्रवण, लेखन आणि अभ्यास वृद्धिंगत करून कौशल्यपूर्ण व्हावे आणि समाज सक्षम करावा, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीचे (लोणेरे) कुलगुरू प्रा. डॉ. कारभारी काळे यांनी केले.

डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी व इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिक अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर्स (पुणे सेक्शन, मुंबई सेक्शन), कॉम्प्युटर सोसायटी ऑफ पुणे त्यांच्या संयुक्त विद्यमाने इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ब्लॉकचेन डिस्ट्रीब्यूटेड सिस्टिम्स अ‍ॅन्ड सिक्युरिटी या तीनदिवसीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. काळे म्हणाले, जिओ स्पेशल सेन्सर व क्वॉंटम टेक्नॉलॉजीमुळे डिजिटलायझेशन आणि सुरक्षेचे नवीन युग सुरू झाले आहे. क्वॉंटम कि डिस्ट्रिब्रूशन तंत्रज्ञानामुळे सुरक्षित संवाद प्रणाली निर्माण होत आहे.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे म्हणाले, ब्लॉकचेन तंत्रज्ञानाने डिजिटल नव्याने व्याख्या केली आहे. डिस्ट्रीब्यूटेड सिस्टिममुळे पारदर्शकता आणि विश्वास यांच्या बाबतीत तोडजोड होऊ नये, यासाठी जागरूक राहणे गरजेचे आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे (पुणे विद्यापीठ)कुलगुरू व आयईईई कॉम्प्युटर सोसायटी पुणे चॅप्टरचे चेअरमन डॉ. राजेश इंगळे यांनी आंतरराष्ट्रीय परिषदांची प्रासंगिकता, आवश्यकता, संशोधनातील संवाद, प्रशिक्षण याची माहिती दिली.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, ज्ञान व कृती यांची सांगड आवश्यक असून अभ्यासकांचे चिंतन समाजाला चालना देते. तंत्रज्ञानातून विश्वशांती या उद्देशासाठी संशोधकांनी कृतिशील रहावे. जपान सरकारच्या सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातील शास्त्रज्ञ डॉ. वैभव मेहता, ऑस्ट्रेलियातील पर्थ विद्यापीठातील संशोधक डॉ. विद्यासागर पोतदार , संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संचालक प्राचार्य विरेन भिर्डी उपस्थित होते. इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. सुहास सपाटे यांनी आभार मानले.

सकाळ

# नवसंशोधकांनी समाज सक्षम करावा

## डॉ. काळे : डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूटच्या आंतरराष्ट्रीय परिषदेला प्रारंभ

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३१ : 'शाश्वत विकास आणि सुरक्षेसाठी तंत्रज्ञान अनिवार्य असून, तंत्रज्ञानाच्या विकासासाठी परिषदांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. नवसंशोधकांनी निरीक्षण, लेखन, अभ्यास करून कौशल्यपूर्ण व्हावे आणि समाज सक्षम करावा', असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी लोणेरेचे कुलगुरू प्रा. डॉ. कारभारी काळे यांनी आज येथे केले.**




**कोल्हापूर** : आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. कारभारी काळे. शेजारी डावीकडून सुहास सपाटे, विरेन भिर्डी, कौस्तुभ गावडे, शुभांगी गावडे, विनीत कोटक, अभयकुमार साळुंखे, राजेश इंगळे, विद्यासागर पोतदार, अमर बुचडे आदी मान्यवर.

येथील सयाजी हॉटेलमध्ये डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आणि इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिक अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर्स (पुणे, मुंबई सेक्शन), कॉम्प्युटर सोसायटी ऑफ पुणेतर्फे 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ब्लॉकचेन डिस्ट्रिब्युटेड सिस्टीम्स अँन्ड सिक्युरिटी' या तीन दिवसीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

'जिओ स्पेशल सेन्सर आणि क्वांटम टेक्नॉलॉजीमुळे डिजिटलायझेशन आणि सुरक्षेचे नवीन युग सुरू झाले आहे. फायनान्स, सप्लाय चेन, विविध इंटरप्राईजेस यामध्ये होणारा ब्लॉगचेनचा वापर प्रशासन गतिमान करण्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी अँड डिस्ट्रिब्युटेड सिस्टीम्स संबंधातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संशोधक तंत्रज्ञ आणि धोरणकर्त्यांनी एकत्रित चर्चा करण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. काळे यांनी केले. तर 'ज्ञान आणि कृती यांची सांगड आवश्यक असून, अभ्यासकांचे चिंतन समाजाला चालना देते. तंत्रज्ञानातून विश्वशांती या उद्देशासाठी संशोधकांनी कृतिशील राहावे', असे आवाहन कार्याध्यक्ष श्री. साळुंखे यांनी केले.

श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्रास्ताविक केले. 'डिस्ट्रिब्युटेड सिस्टीममुळे पारदर्शकता आणि विश्वास यांच्या बाबतीत तोडजोड होऊ नये, यासाठी जागरूक राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणेचे कुलगुरू डॉ. राजेश इंगळे यांनी आंतरराष्ट्रीय परिषदांची आवश्यकता स्पष्ट केली. यावेळी जपान सरकारच्या सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातील शास्त्रज्ञ डॉ. वैभव मेहता, ऑस्ट्रेलियातील पर्थ विद्यापीठातील संशोधक डॉ. विद्यासागर पोतदार, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संचालक प्राचार्य विरेन भिर्डी आदी उपस्थित होते. डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. सुहास सपाटे यांनी आभार मानले.

### सर्वच क्षेत्रांत डाटा सुरक्षित ठेवणे शक्य

**■ या परिषदेत आयईईई पुणे चॅप्टरचे चेअरमन डॉ. अमर बुचडे यांनी ब्लॉकचेन टेक्नॉलॉजीमुळे सर्वच क्षेत्रांत डाटा सुरक्षित ठेवणे शक्य झाले असल्याचे सांगितले. डॉ. विनित कोटक यांनी संशोधन क्षेत्रातील व्यासंग आणि सामाजिक विकास यांच्यातील सहसंबंधावर प्रकाश टाकला. दरम्यान, दक्षिण महाराष्ट्रातील या पहिल्याच परिषदेला सात देशांतील एक हजार ८९ संशोधकांचे शोधनिबंध प्राप्त झाले आहेत.**

पुण्य नगरी

# शाश्वत विकास, सुरक्षेसाठी तंत्रज्ञान अनिवार्य

## कुलगुरू डॉ. काळे; डॉ. बापूजी साळुंखे इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद सुरू




**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शाश्वत विकास आणि सुरक्षेसाठी तंत्रज्ञान अनिवार्य असून, तंत्रज्ञानाच्या विकासासाठी परिषद यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. नवसंशोधकांनी निरीक्षण, श्रवण, लेखन आणि अभ्यास वृद्धिंगत करून कौशल्यपूर्ण व्हावे आणि समाज सक्षम करावा, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीचे (लोणेरे) कुलगुरू प्रा. डॉ. कारभारी काळे यांनी केले.

डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आणि इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिक अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर्स (पुणे सेक्शन, मुंबई सेक्शन) कॉम्प्युटर सोसायटी ऑफ पुणे त्यांच्या संयुक्त विद्यमाने इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ब्लॉकचेन डिस्ट्रिब्युटेड सिस्टीम्स अँड सिक्युरिटी या तीन दिवसीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अशा प्रकारची दक्षिण महाराष्ट्रातील ही पहिलीच परिषद आहे. सात देशांतील तब्बल १०८९ संशोधकांचे शोधनिबंध परिषदेसाठी आले आहेत.

डॉ. काळे म्हणाले, जिओ स्पेशल सेन्सर आणि क्वॉंटम टेक्नॉलॉजीमुळे डिजिटलायझेशन आणि सुरक्षेचे नवीन युग सुरू झाले आहे. क्वॉंटम की डिस्ट्रिब्युशन तंत्रज्ञानामुळे सुरक्षित संवादप्रणाली निर्माण होत आहे. अत्याधुनिक वैज्ञानिक बदलांची माहिती देताना त्यांनी विविध समस्यांवरील तांत्रिक उपायांची चर्चा केली.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे प्रास्ताविकामध्ये म्हणाले, ब्लॉकचेन तंत्रज्ञानाने डिजिटल नव्याने व्याख्या केली आहे. डिस्ट्रिब्युटेड सिस्टीममुळे पारदर्शकता आणि विश्वास यांच्या बाबतीत तोडजोड होऊ नये, यासाठी जागरूक राहणे गरजेचे आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे (पुणे विद्यापीठ) कुलगुरू आणि आयईईई कॉम्प्युटर सोसायटी पुणे चॅप्टरचे चेअरमन डॉ. राजेश इंगळे यांनी आंतरराष्ट्रीय परिषदांची प्रासंगिकता, आवश्यकता, संशोधनातील संवाद, प्रशिक्षण यावर विस्तृत भाष्य केले.

आयईईई पुणे चॅप्टरचे चेअरमन डॉ. अमर बुचडे म्हणाले, ब्लॉकचेन टेक्नॉलॉजीमुळे आरोग्य, कायदा, शिक्षण, औषधनिर्माण अशा सर्व क्षेत्रांत डाटा सुरक्षित ठेवणे शक्य झाले आहे. डॉ. विनीत कोटक यांनी संशोधन क्षेत्रातील व्यासंग आणि सामाजिक विकास यांच्यातील सहसंबंधावर प्रकाश टाकला.

परिषदेचे अध्यक्ष श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, ज्ञान आणि कृती यांची सांगड आवश्यक असून, अभ्यासकांचे चिंतन समाजाला चालना देते. तंत्रज्ञानातून विश्वशांती या उद्देशासाठी संशोधकांनी कृतिशील राहावे.

जपान सरकारच्या सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातील शास्त्रज्ञ डॉ. वैभव मेहता, ऑस्ट्रेलियातील पर्थ विद्यापीठातील संशोधक डॉ. विद्यासागर पोतदार, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संचालक प्राचार्य वीरेन भिर्डी आदी उपस्थित होते. इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. सुहास सपाटे यांनी आभार मानले.